| MHNS240003352025 | <u>नियमित दिवाणी दावा क्र.८४/२०२५ मधील नि.क्र.३४ वरील आदेश</u><br><br>**<u>राकेश बोवाजी चव्हाण</u>**<br>**वि.**<br>**भाऊ त्र्यंबक गवळी, वैगरे** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज प्र.वादी क्र. ०१ ते ११ यांनी त्यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ होउन त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीत सादर केला आहे. सदर आदेश याच अर्जावर असल्याने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्याचा याठिकाणी उहापोह करण्यात आला नाही.

२. वादी यांनी सदर अर्जावरच त्यांचा खुलासा दाखल करून प्र.वादीच्या अर्जास प्रखर आक्षेप घेउन अर्जामध्ये किती दिवसाचा विलंब झाला आहे याबाबत कथन केलेले नाही. अर्ज बेकायदेशिर असल्याने त्यांनी तो नामंजुर करण्याची विनंती केली.

३. उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा तपशिलवार युक्तिवाद ऐकला.

४. अभिलेखाची पाहणी केली असता वादी यांनी ठराव व ताकिदीकरिता सदर दावा दाखल केलेला आहे. प्र.वादी क्र.०१ ते ११ यांना दि.१०.०३.२०२५ तसेच दि.१९.०३.२०२५ रोजी समन्सची बजावणी होवुनही त्यांनी मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल केलेली नाही त्यामुळे दावा नियमानुसार त्यांच्याविरुध्द विनाकैफियत चालविण्यात आलेला आहे. प्रतिवादी हे सदर दाव्यास त्यांची कैफियत दाखल करुन विरोध करत आहेत. सदर दावा हा स्थावर मिळकती संदर्भात आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांचे हक्कसंबंध गुणदोषारोवर सिध्द करण्याकामी परवानगी देणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने आवश्यक आहे. असे असले तरी, प्र.वादी क्र. ०१ ते ११ यांना कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. सदर विलंब काही रक्कम खर्च म्हणुन त्यांच्याकडुन वादी यांना दिल्यास प्रकरणाचा उद्येश सफल होईल व सदर प्रकरण हे गुणदोषारोवर न्यायनिर्णीत होण्यास मदत होणार आहे. सदर अर्ज मंजुर केल्यावर उभय पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत व गुंतागुंत वाढणार नाही. सबब, निम्न आदेश.

## <u>आ दे श</u>

०१. प्र.वादी क्र.०१ ते ११ यांचा नि.क्र.३४ वरील अर्ज त्यांनी वादी यांना एकत्रित रक्कम रुपये २००/– खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी यांनी कलम ०१ मधील पुर्तता केल्यास त्यांना कैफियत अभिलेखावर सादर करण्याची परवानगी देण्यात येते.

SHIPKULE CHARUDATTA — Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA Date: 2025.06.18 15:58:09 +0530

**दि. १८/०६/२०२५** **(चारूदत्त उद्धव शिपकुले)**
**ठिकाण– सटाणा.** **दिवाणी न्यायाधिश क. स्तर, सटाणा.**